क्रमांक:-एडीव्ही ३११९/सीआर ६०/२०१८/तीन

# घोषणा

**विषय :- अनाथ उमेदवारांच्या दाव्यांबाबत.**

शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ अन्वये अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण देण्यात आले आहे. त्यानुसार अनाथ उमेदवारांसाठी शासनाने विहित केलेल्या सवलती व आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता अर्जामध्ये निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. यानुसार करावयाच्या दाव्याच्या अनुषंगाने आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आली आहे.

**२.** आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या खात्यामध्ये (Profile) ज्या अनाथ उमेदवारांनी यापूर्वी अराखीव (Open) असे नमूद केले आहे व दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या आरक्षणाकरीता दावा करावयाचा आहे, अशा उमेदवारांना आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीवरुन कोणत्याही परीक्षा/निवडीकरीता अर्ज सादर करण्यापूर्वी अनाथ उमेदवारांकरीता असलेला आरक्षणाचा दावा करता येईल. असे करताना उमेदवाराला सद्यस्थितीत शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : संकिर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ६ जून, २०१६ अन्वये जारी करण्यात आलेल्या कार्यपद्धती नुसार वितरित करण्यात आलेल्या विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्राचा क्रमांक, दिनांक इत्यादी तपशील नमूद न करता तात्पुरत्या स्वरुपात दावा करता येईल. अनाथ आरक्षणाकरीता पात्र ठरण्यासाठी उमेदवाराने महाराष्ट्रातील अधिवासाबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील अधिवासाचा दावा 'होय' असेल तरच संबंधित उमेदवाराला आरक्षणासंदर्भातील लाभ घेता येतील.

**३.** अनाथ आरक्षणाकरीता दावा केलेल्या उमेदवाराने शासनाकडून विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार अनाथ प्रमाणपत्र संबंधित यंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेणे व त्याची आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीवरील त्यांच्या खात्यामध्ये नोंद घेणे आवश्यक राहील, याबाबत आयोगाकडून स्वतंत्रपणे यथावकाश सूचना देण्यात येतील.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- १५ डिसेंबर, २०१८

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग